**कृपया प्रसिध्दीसाठी** **23 डिसेंबर 2009**

## भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.राम नाईक यांनी 23 डिसेंबर 2009 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *"रेल्वे श्वेत पत्रिका - पंतप्रधानानी माफी मागावी"- राम नाईक*

**मुंबई, बुधवार :** "रेल्वे मंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यानी लोकसभेत सादर केलेल्या श्वेतपत्रिकेमुळे तथाकथित 'व्यवस्थापन गुरु' माजी रेल्वेमंत्री श्री.लालू प्रसाद यादव यांचे पितळ अक्षरशः उघडे पडले आहे. त्यानी संसदेला सादर केलेल्या दिशाभूल करणा-या अर्थसंकल्पानां मंत्रीमंडळाने मान्यता दिली होती. मंत्रीमंडळाची जबाबदारी सामुदायिक असते हे लक्षात घेऊन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांनी दिशाभूल करणारे अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल देशाची क्षमा मागितली पाहिजे," अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी आज मुंबईत एका पत्रकार परिषदेमध्ये केली.

श्री. लालू प्रसाद सांगत असलेला नफ्याचा आकडा फसवा आहे अशी टीका श्री. राम नाईक केवळ विरोधासाठी करीत आहेत असा माझ्यावर आरोप करणा-यांचे डोळे आता निदान श्रीमती ममता बॅनर्जींची श्वेतपत्रिका वाचून तरी उघडतील अशी आशा व्यक्त करुन श्री.राम नाईक म्हणाले, "नुकत्याच संपलेल्या लोकसभा अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी रेल्वेमंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांनी संसदेला सादर केलेल्या श्वेतपत्रिकेत 2006-2007 या वर्षात 20,339 कोटी रुपयांची 'कॅश-सरप्लस' होती, श्री.लालू प्रसादांच्या म्हणण्याप्रमाणे नफा नव्हता हे स्पष्टपणे म्हटले आहे. श्री. लालू प्रसाद यांनी जेवढा गवगवा केला तेवढे प्रत्यक्षात काम केले नाही. गेल्या पाच वर्षात 189 सुपरफास्ट गाड्या त्यांनी जाहीर केल्या. त्यातील अनेक गाड्यांची धावण्याची कालमर्यादा कमी करण्यात आली नाही परंतु भाडे मात्र वाढविण्यात आले. तसेच 2008-2009 या वर्षात 'तत्काल आरक्षणामुळे' रेल्वेला रु.605 कोटीचे उत्पन्न मिळाले; त्यासाठी तत्काल आरक्षणासाठी सुरुवातीला 5.6 टक्के जागा आरक्षित होत असत हे प्रमाण 14.2 टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले. त्यामुळे नेहमीच्या आरक्षण व्यवस्थेतून जागा मिळणे अवघड होऊन प्रवाशांची गैरसोय तर झालीच शिवाय भ्रष्टाचार आणि गैरकारभार वाढला असल्याचे या श्वेतपत्रिकेत स्पष्टपणे मांडण्यात आले आहे. आणखीही बरीच महत्वाची माहिती श्वेतपत्रिकेतून उपलब्ध झाली आहे."

"2007-2008 या वर्षात रेल्वेच्या आर्थिक स्थितीला फायदा देणारी कलाटणी (टर्न-अराऊंड) दिल्याची शेखी श्री.लालू प्रसाद यांनी मिरविली होती तर 2008-2009 चा अर्थसंकल्प सादर करताना त्यांचा शेर होताः

'जादू और टोना, हमने दिखाया था पिछले साल
इस बार पूरा इंद्रजाल देख लीजिए.'

या इंद्रजालामुळे 'व्यवस्थापन गुरु' म्हणून देश-विदेशात श्री.लालू प्रसादांची प्रशंसा झाली. ते अर्थसंकल्प सादर करीत असताना सा-या देशाने पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह आणि श्रीमती सोनीया गांधी जोरजोराने बाके वाजवून त्यांना प्रोत्साहन देत होते हे पाहिले आहे. परंतु श्रीमती ममता बॅनर्जींच्या श्वेतपत्रिकेने श्री. लालू प्रसाद यांच्या इंद्रजालाचा बुरखा फाडला आहे. संसदीय कार्यप्रणालीत रेल्वे अर्थसंकल्पाचे पावित्र्य लक्षात घेऊन या फसवणुकीबद्दल अर्थतज्ज्ञ पंतप्रधानानीं खुलासा करुन देशाची माफी मागितली पाहिजे," अशी मागणीही श्री.नाईक यांनी केली.

श्वेतपत्रिकेत रेल्वेसमोर असलेले प्रश्न, ते सोडविण्याचे मार्ग, हिशेब ठेवण्याची पध्दत, वगैरे बाबींचीही चर्चा करण्यात आली आहे. 'रेल्वेला परिस्थितीच्या या गोंधळातून वेगाने पुढे जाण्याचे आव्हान स्विकारायचे असेल तर समर्थपणे त्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे' असे शेवटी म्हटले आहे. त्यामुळे व्यापार, उद्योग, प्रवासी आणि संसद या सर्व स्तरांवर श्वेतपत्रिकेवरती चर्चा आणि विचार-विनिमय करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करुन तो करण्याचे आवाहन श्री.राम नाईक यांनी केले आहे.

"रेल्वेच्या श्वेतपत्रिकेत उपनगरी रेल्वेसंबंधी वेगळा उहापोह केलेला नाही. मी स्वतः अशी श्वेतपत्रिका काढण्याची विनंती यापूर्वी श्री.जॉर्ज फर्नांडिस रेल्वेमंत्री असताना केली होती त्यानुसार 10 सप्टेंबर 1990 रोजी त्यांनी ती प्रसिध्द केली होती. गेल्या 20 वर्षात उपनगरी प्रवाशांची संख्या अफाट वाढली असून प्रवाशांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. रोज कुठेना कुठे गाड्यांचा खोळंबा होतो आहे. त्यामुळे मुंबई उपनगर रेल्वेचीही नवी श्वेतपत्रिका काढण्यात येऊन त्यावरही चर्चा करण्यात यावी" अशी मागणीही श्री.नाईक यांनी केली आहे.

**(कार्यालय सचिव)**